**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफिकेशन सन २०१०—११**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक १७/८/२०१०**
**दुपारी १.०० वाजेपर्यंत**
**फ्लेक्स व बॅनर**
**बयाणा रक्कम रूपये १०००/—**

शिक्षण मंडळ पुणे मनपातर्फे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. सदर कार्यक्रमासाठी विविध प्रकारचे व विविध साईजमध्ये फलेक्स व बॅनरची वेळोवेळी छपाई करून घ्यावी लागते.

- **कापडी बॅनर —**

१. सदर बॅनरवर कार्यालयाने दिलेला मजकुर २ रंगात व कार्यालयाने नमुद केलेल्या साईजमध्ये छपाई करावी लागेल.

२. कापडी बॅनरचा दर प्रति स्के.फूट सर्व करासह देण्यात यावा.

३. शिक्षण मंडळाचे आदेशाप्रमाणे सदर बॅनर जागोजागी बाधंण्याचा दर प्रती नग द्यावा.

- **फ्लेक्स —**

१. फलेक्सकरीता मिडीया वापरावे. मिडीयाची जाडी १४ अंश असावी.

२. सदरचे फलेक्स कार्यालयाचे सूचनेनुसार वेगवेगळया ठिकाणी बसवून द्यावे लागतील

३. लाकडी / लोखंडी फ्रेमिंगसह व फ्रेमविरहित  दर प्रति स्के.फुट द्यावा.

५. सदरचे दर सर्व करासह व वाहतुकीसह द्यावेत.

सदर कापडी बॅनर व फलेक्स ची छपाई सन २०१०—११ या शैक्षणिक वर्षात कार्यालयाच्या आवश्यकतेप्रमाणे छपाई करून दयावी लागेल.

| | |
|---|---|
| **अध्यक्ष,** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका** | **शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका** |

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
# शिवाजीनगर, पुणे ४११००५
# फ्लेक्स व बॅनर
# निविदा अटी व शर्ती सन २०१०—११.

१. पुणे दैनिक लोकसत्ता व दैनिक लोकमत दि. १०/०८/१० मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं. १७ /भांडार शैक्षणिक आर्थिक वर्ष २०१०—११ चे करिता खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, **फ्लेक्स व बॅनर छपाई करून** विशिष्ट मुदतीत पुरवठा करण्यासाठी अल्पकालावधीची निविदा मागविण्यात येत असून, त्या निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.

**अटी व शर्ती :—**

१.निविदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निविदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.

२.निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असून अ पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**अ.पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**अ)** निविदा रकमेच्या शेकडा १**%** या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD) किंवा रोख भरणा कार्यालयात भरावा लागेल.

**ब)** निविदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र. सदरच्या नोदणी पत्रात धंदयाच्या (छपाई)स्वरूपाची नोंद असणे आवश्यक आहे.

**क)** शासन, शासन अंगिकृत व इतर संस्थांना छपाई करून दिल्याबाबतची किंवा २ वर्षाचा छपाईच्या अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्रे, तसेच मशीन शेडयुल निविदेसोबत सादर करावेत.

**ड)** आर्थिक वर्ष २००९—१० मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च १० अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.

**इ)** निविदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (Pan No.) छायांकित प्रत, तसेच मागील ३ वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत.

**ई)** निविदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदांराची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निविदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

**उ)** व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक.

**ऊ)** निविदादाराची निविदा कामाची पुर्तता करण्यासंबंधिची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅकेचे प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हन्सी) चालू वर्षाची निविदेच्या एकूण किमतीच्या किमान २५ टक्के रकमेची आवश्यक आहे.

**ए) अ** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे वेळी ठेकेदारांना समक्ष कामी सादर कराव्या लागतील.

४. **अ** पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत मा.शिक्षण मंडळाचा निर्णय अतिंम राहील.

५.पाकीट “ब” मध्ये निविदा धारकाने छपाईचा दर प्रति नग सर्व करासह दयावा. पाकीटावर निविदा धारकाचे नाव, निविदा क्रं.नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

**६.निविदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

१. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. **फ्लेक्स व बॅनर** प्रती नग सर्व शाळेत वाटपासह दर अंकी व अक्षरी लिहावेत.

२. निविदा स्विकारण्याचा,नाकारण्याचा पुर्ण अगर अशंत: मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा.शिक्षण मंडळास राहिल.

३. निविदाकरीता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

४ .मान्य निविदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतून काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

५.मान्य निविदादारास करार करतेवेळी **छपाईच्या** एकूण किंमतीच्या ५% रक्कम सुरक्षा/ अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD) किंवा रोखीने भरावी लागेल.

६.निविदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २०१०—११ करीताच करार केल्यापासून बंधनकारक राहतील.

७. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

८. **फ्लेक्स व बॅनर** पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा.शिक्षण मंडळास राहिल.

९. शैक्षणिक वर्ष २०१०—११ मध्ये **स्पेसिफिकेशन** मध्ये नमुद केल्याप्रमाणे **फलेक्स व बॅनर करून दयावी** लागेल. **फ्लेक्स व बॅनर करून** न दिल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निविदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

१०.करारनाम्यानुसार व स्पेसिफिकेशननुसार पुरवठा करावयाची **फ्लेक्स व बॅनर स्वखर्चाने जकातीच्या रकमेसह व वेळेवर शिक्षण मंडळाच्या कार्यालयीन कोठी मध्ये** पोहचविण्याची जबाबदारी निविदादारावर आहे.

११. **फ्लेक्स व बॅनर स्पेसिफिकेशनप्रमाणे** असल्याची खात्री मा. शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याने आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

१२.निविदादाराचे उत्पादक युनिटला करारनामा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार मा. शिक्षण मंडळ अथवा त्यांचे अधिकृत सभासद भेट देईल त्याकामी निविदादाराने सर्व सहकार्य केले पाहिजे.

१३.एकदा भरलेली निविदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

१४. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम धनादेशाने परत केली जाईल. बयाणा रक्कम भरल्याची मूळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१५. मूल्यमापन पुस्तिका छपाई करून देणेबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१६.निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा.शिक्षण मंडळास आहे.

१७. **फ्लेक्स व बॅनर करून** पुरविल्यानंतर त्याची शिक्षण मंडळाकडून पाहणी करण्यात येईल. व विहित नमुन्यात आहे किंवा नाही हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेल्या **फ्लेक्स व बॅनर** कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत.

१८. कार्यालय स्पेसिफिकेशनप्रमाणे मूल्यमापन व मार्गदर्शक पुस्तिकेची छपाई करून दयावी व त्याचे देयक मा. शिक्षणप्रमुख शिक्षण मंडळ यांचे नावाने या कार्यालयास सादर करावे लागेल. मुख्याध्यापकांची पुस्तिका मिळाल्याबाबतची पोहोच, स्वाक्षरी व शिक्यासह, देयकासोबत सादर करावी लागेल.

१९. निविदा दिनांक १७/८/२०१० रोजी दुपारी ३ वाजता किंवा मा.शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील.वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे.

दिनांक:—

**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

**शिक्षण प्रमुख**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

.........................................................................................................

## प्रतिज्ञालेख

मी,श्री.———————————————————————————— वय ———— वर्ष, व्यवसाय — धंदा, राहणार ——————————————————————————— निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निविदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली आहे व निविदेसोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निविदेसोबत दाखल करित आहे.

पुणे:—

दिनांक:—

पुरवठा धारकाची नाव,सही व शिक्का